# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगोत्री परिसर,गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२

दूरध्वनी – (०२५३) २२३०२९८,२२३१७१५,२२३०२२७,२२३०४५९ फॅक्स – (०२५३) २२३१७१६.


दिनांकः ३० सप्टेंबर २०१३.

## अभ्यासकेंद्र प्रमुखांना मागासवर्गीय विद्यार्थ्यासाठीच्या शिष्यवृत्ती संदर्भात आवाहन

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या सर्व अभ्यासकेंद्र प्रमुखांना सुचित करण्यात येते की, मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनाही अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST), भटक्या जाती व विमुक्त जमाती (VJ/NT), इतर मागास वर्ग (OBC), विशेष मागास प्रवर्ग (SBC) या प्रवर्गासाठी असलेली शिष्यवृत्ती योजना लागू झालेली आहे. याबाबत मा. संचालक, समाजकल्याण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांनी प.क्रं. सकसं/शिक्षण/भासशि/राष्ट्रभाषा/का-४/११-१२/१०९४. दिनांक १२/९/२०११. अन्वये सर्व विशेष समाजकल्याण अधिकारी, यांना सूचना दिल्या आहेत पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

तसेच मा. सचिव, आदिवासी विकास यांनीही प.क्रं.संकीर्ण-२००९/प्र.क्र.१५०/का.१२. दिनांक १२ जानेवारी २०१० अन्वये मा. आयुक्त, आदिवासी विकास, मा. अप्पर आयुक्त व सर्व प्रकल्प अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील विद्यार्थ्यांना भारतसरकार शिष्यवृत्ती देय आहे असे पत्रात नमूद केलेले आहे.

भारत सरकार शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे असल्याकारणाने यासंदर्भात संबधित अभ्यासकेंद्र प्रमुखांनी संबंधित मा. विशेष समाजकल्याण अधिकारी व मा. प्रकल्प अधिकारी आदिवासी विकास, यांच्याशी संपर्क साधून त्यांचेकडून युजरआयडी व पासवर्ड मिळवून आपल्या अभ्यासकेंद्रांच्या पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज निर्धारीत मुदतीत भरुन संबंधितांकडे सादर करावे व केलेली कार्यवाही उपकुलसचिव, शैक्षणिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, यांना कळवावी, ही विनंती.

30/9/2013

उपकुलसचिव, शैक्षणिक | संचालक, विद्यार्थी सेवा विभाग | कुलसचिव,